# भाषांमध्ये प्रभावी आशय निर्मितीसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर आवश्यक
# टिमवित 'ग्रोईंग रिजनल लँग्वेज व्हॉईसेस' या विषयावरील
# राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन

नावीन्यपूर्ण आशय निर्मिती करणारी पिढी दरवर्षी बदलत असते. सध्या भारतात पाचवी पिढी सुरु झाली आहे. या पिढीत नवनवीन साधने येत आहेत. नवीन येणाऱ्या साधनामध्ये स्वतःला अपडेट करीत राहिल्यास आशय निर्मितीमध्ये आपणास अच्छे दिन नक्कीच येणार आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करुन भारतीय भाषेत आशय निर्मिती करणारे अधिकाधिक प्रभावी ठरु शकतात. यासाठी आवडीचा विषय घेऊन त्या विषयात अल्गोरिदमच्या गरजेनुसार आशय निर्मिती करत राहणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे मत उद्योजक आणि डिजिटल स्ट्रॅटेजिस्ट विनायक पाचलग यांनी व्यक्त केले. प्रादेशिक भाषांच्या सशक्तीकरणासाठी आणि भारतीय भाषांचा क्रिएटर इकॉनॉमीमधील प्रभाव वाढवण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उद्‌घाटन झाले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. गीताली टिळक, प्र-कुलसचिव सुवर्णा साठे, टिमवि ट्रस्टचे सचिव अजित खाडीलकर, मास कॉम विभागाचे प्रमुख डॉ. केशव साठ्ये, अधिष्ठाता डॉ. उज्ज्वला बर्वे, उद्योजक आणि डिजिटल स्ट्रॅटेजिस्ट विनायक पाचलग, अमुक तमुक पॉडकास्टचे सहसंस्थापक ओमकार जाधव, शार्दुल कदम, पॉडकॉस्ट होस्ट आणि स्ट्रॅटेजिस्ट रोहित कोकणे उपस्थित होते. 'ग्रोइंग रिजनल लँग्वेज व्हॉईसेस : इंडियन लँग्वेज इन क्रीएटर इकॉनॉमी' या विषयावर परिषदेत उद्‌घाटन सत्रात प्रमुख वक्ते डिजिटल स्ट्रॅटेजिस्ट विनायक पाचलग यांनी बदलत्या तंत्रज्ञानाबरोबरच भाषेचा आढावा घेतला, ते म्हणाले, नोटाबंदीच्या काळात भारत सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी भारतीय भाषांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य केला. यामुळे डिजिटल व्यवहारांना चालना मिळाली आणि स्थानिक भाषांमध्ये संवाद अधिक सुलभ झाला. डिजिटल तंत्रज्ञानामुळे राजकीय प्रचार आणि सामाजिक संवादाचा चेहरा बदलला असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. स्मार्ट फोन आणि डिजिटल तंत्रज्ञान हे महत्त्वाचे बदल करणारे घटक ठरले आहेत. स्मार्ट फोनची किंमत कमी झाल्याने सर्वसामान्यांनी देखील आपल्यात बदल केला. इंटरनेटमुळे जगभरातील माहिती लोकांना घरात बसून मिळू लागली. यामुळे राजकारण आणि लोकांच्या संवादाच्या पद्धतीत बदल झाले. इंग्रजीबरोबरच भारतीय भाषांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. मराठी भाषेतील डिजिटल सामग्रीला एक वेगळी ओळख मिळाली. यामुळे मराठीतून व्हिडिओ कंटेंट आणि मुलाखतींचे महत्त्व वाढले. तंत्रज्ञानाच्या वापराने आणि डिजिटल माध्यामांमुळे महत्वपूर्ण बदल झाले आहे.

दुसऱ्या सत्रात अमुक तमुक पॉडकास्टचे सहसंस्थापक ओमकार जाधव, सहसंस्थापक शार्दुल कदम, पॉडकास्ट होस्ट आणि स्ट्रॅटेजिस्ट रोहित कोकणे यांनी मार्गदर्शन केले. अमुक तमुक पॉडकास्टचा निर्मितीपासून आतापर्यंतचा प्रवास त्यांनी उलगडला. लोकांना काय आवडते ते दाखविण्याचा प्रयत्न आमच्याकडून होत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. रोहित कोकणे यांनी पॉडकॉस्ट संकल्पनेबाबत मार्गदर्शन केले. सध्याच्या नवयुगात पॉडकॉस्टचे महत्त्व वाढले आहे.

परिषदेत प्रादेशिक भाषांच्या डिजिटल माध्यमातील योगदानावर सखोल चर्चा आणि शोधनिबंध सादरीकरण करण्यात आले. विभाग प्रमुख डॉ. केशव साठ्ये यांनी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, डिजिटल विश्वात काम करताना सतर्क राहणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचा अतिरेकी वापर टाळून योग्य तेवढा आशय त्यातून घेऊन आपली स्वतःची प्रतिभा निर्मितीत वापर केल्यास या क्षेत्रात नक्कीच यश मिळेल.

सूत्रसंचालन प्रा. अनुजा पालकर यांनी केले.

